Reading Passage

## <u>अपघात</u>

मी आणि माझे आईबाबा एकदा कारमधून चाललो होतो. माझ्या सॉकरच्या गेमसाठी आम्हाला दहा वाजता पोचायचे होते. पण पुढच्या गाड्या खूपच हळूहळू चालल्या होत्या. बहुतेक पुढे काहीतरी अपघात झाला असावा. दहा मिनिटे झाली, पंधरा झाली, अर्धा तास झाला तरी आम्ही एक मैलसुद्धा पुढे सरकलो नव्हतो. माझा इतका महत्वाचा गेम चुकणार म्हणून मी खूप चिडलो होतो. आईबाबा पण कंटाळले होते. शेवटी एक तासाने आम्ही जिथे अपघात झाला होता तिथे पोचलो. एका कार अजूनही जळत होती. पोलिसांनी सांगितले की आतल्या माणसांना कसेतरी बाहेर काढून हॉस्पिटलमध्ये नेले आहे आणि त्यात एक लहान मूलही आहे. हे ऐकल्यावर मला फार वाईट वाटले. मी फक्त माझ्या गेमचा विचार करीत होतो पण अपघात झालेल्या लोकांचे काय झाले असेल याचा विचारही माझ्या मनात आला नाही. हा अपघात मी कधीच विसरू शकणार नाही.

प्रश्न:

१. मी आईबाबांबरोबर कशासाठी चाललो होतो ?

२. आमच्यापुढच्या गाड्या हळूहळू का चालल्या होत्या?

३. मी का चिडलो होतो?

४ अपघात झालेल्या माणसांना कुठे नेले होते?

५ मला का वाईट वाटले?

Reading Passage

**<u>पक्ष्यांचे पंख</u>**

पक्ष्यांच्या शरीराचा आकार माशासारखा निमुळता असतो. त्यामुळे त्यांना उडताना हवेचा अडथळा येत नाही. त्यांच्या पंखांत खूप शक्ती असते. खूप जोराच्या वाऱ्यातही त्यांचे पंख उलटे होत नाहीत. निसर्गाने त्यांना पंखाखाली एक पट्टा दिला आहे. त्यामुळे पंख ठरावीक जागेच्या मागे जात नाहीत. पंखांचा उपयोग उडण्यासाठी होतो. शेपटीचा उपयोग दिशा बदलण्यासाठी होतो. पंख हे पक्ष्यांचे सर्वस्व आहे. याच पंखांच्या जोरावर पक्षी शेकडो-हजारो मैलांचा प्रवास करू शकतात. हवामान वाईट असेल किंवा अन्न कमी असेल तर त्या ठिकाणाहून पक्षी योग्य हवामान असलेल्या ठिकाणी जातात. ऋतु बदलला की परत मूळ जागी न चुकता येतात. हा सगळा प्रवास ते कसा काय करू शकतात हे एक आश्चर्यच आहे. या पक्ष्यांना बघूनच माणसाला विमानाची कल्पना सुचली. आकाशात उडणारे विमान जेव्हा आपण पाहतो तेव्हा प्रचंड आकाराचा पक्षीच उडतो आहे की काय असे वाटते.

प्रश्न -

१ पक्ष्यांना उडताना हवेचा अडथळा का येत नाही?

२ पक्ष्यांना दिशा बदलायला कशाची मदत होते?

३. जोराच्या वाऱ्यात पक्ष्यांचे पंख उलटे का होत नाहीत?

४.हवामान वाईट असेल किंवा अन्न कमी असेल तर पक्षी काय करतात?

५ पक्ष्यांना पाहून माणसाला कसली कल्पना सुचली?

Listening Passage

**<u>नेपोलियन</u>**

अशक्य हा शब्दच मला माहीत नाही असे म्हणणारा नेपोलियन बोनापार्ट फ्रान्सचा राजा होता. एकदा तो घोड्यावरून जात असताना काही कामगारांना दगड हलवताना पाहिले. दगड प्रचंड मोठे असल्यामुळे ते हलवताना त्यांना  खूप त्रास होत होता. जवळच एक माणूस खुर्चीत बसून त्यांच्या अंगावर ओरडत होता. ते पाहून नेपोलियन त्याला म्हणाला, " तुम्ही या कामगारांना मदत का करीत नाही? " तो म्हणाला’ ते त्यांचे काम आहे. मी त्यांचा मालक आहे, मी त्यांना मदत का करू? " मग नेपोलियन स्वतः घोड्यावरून खाली उतरला आणि कामगारांबरोबर काम करू लागला. त्या माणसाने विचारले, " आपले नाव काय? ' नेपोलियन म्हणाला, " मला नेपोलियन बोनापार्ट म्हणतात. " हे ऐकून तो मालक थरथर कापायला लागला. त्याने नेपोलियनचे पाय धरले.

प्रश्न -

१. घोड्यावरून जाताना नेपोलियनने काय पाहिले?

२. खुर्चीत बसलेला माणूस काय करीत होता?

३. तो माणूस कामगारांना मदत का करीत नव्हता?

४. नेपोलियनचे नाव ऐकताच तो थरथर कापायला का लागला?

५ अशक्य हा शब्द नेपोलियनला माहीत नव्हता म्हणजे काय?

Listening Passage

**मी पाहिलेले लग्न**

माझ्या मावशीच्या मुलीच्या लग्नाला आम्ही भारतात गेलो होतो. तिथे माझा मामा-मामी आणि आजी पण होती. लग्नाच्या ठिकाणी खूप नातेवाईक आणि पाहुणे जमले होते. सर्वांनी छान छान कपडे घातले होते. नवरा-नवरीचे लग्न लागले आणि सर्वांनी टाळया वाजवल्या.

लग्न लागल्यावर नवरा-नवरी स्टेजवर गेले. तिथे त्यांच्यासाठी दोन खुर्च्या सजवून ठेवल्या होत्या. लग्नासाठी जमलेले पाहुणे तिथे जाऊन त्यांचे अभिनंदन करीत होते. फोटोग्राफर त्या सर्वांचे फोटो काढीत होता. लग्नाचे जेवण तर फारच छान होते. जेवणात बटाट्याची भाजी आणि जिलबी होती. नंतर माझे आवडते आईस्क्रीम होते. त्यामुळे मी खूष झालो. भारतातले लग्न कसे असते ते मी पहिल्यांदाच पाहात होतो. त्यामुळे हे लग्न मी कधीच विसरणार नाही.

प्रश्न -

१.आम्ही भारतात कशासाठी गेलो होतो?

२. लग्नाला कोण कोण आले होते?

३. स्टेजवर जाऊन पाहुणे काय करीत होते?

४. लग्नात माझ्या आवडीचे कोणते पदार्थ होते?

५ हे लग्न मी का विसरणार नाही